# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

तळ मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/ ५३२/२०२२-२३** **दिनांक :२५ /११/२०२२**

**प्रति,**
**सिस्टम ॲनालिस्ट,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय – संकेत स्थळावर जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बाधित होणारी धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामी सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

**(कविता बोरकर)**
**सहाय्यक आयुक्त तथा**
**वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

G:\2022-2023\2022-23\SADAR (छाटणी,परवानगी धोकादायक,विकासकामात)\सादर व पेपर नोटीस\पेपर हरकती नोटीस

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

तळ मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/ ५३२ /२०२२-२३ दिनांक : २५ /११/२०२२

## // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| १) श्री. कांता साताप्पा पाटील यांचे दि.२२/११/२०२२ रोजीचे पत्र व श्री. मोहन अर्जुनराव पोळ यांचे दि.१५/११/२०२२ रोजीचे पत्र. | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
| १ | नारळ | २५ते ३५फुट | ०१ | १५ वर्ष | सदरचे झाड बंगला नं -३ पोकार कॉम्पलेक्स,साईकृपा कॉम्पलेक्स जवळ,काशिगाव,काशिमिरा,मिरारोड (पु.) येथिल घराच्या मागील बाजूस असून झाडाच्या झावळया व नारळ घराच्या छतावरील पत्र्यावर वारंवार पडून नुकसान होत आहे.तसेच जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरील झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २) कृष्णास्थळ यशोधा को.ऑ.हौ.सो.लि.यांचे दि.०३/१०/२०२२ रोजीचे पत्र. | | | | | |
| २ | नारळ | २०ते २५ फुट | ०१ | १२ वर्ष | सदरचे झाड कृष्णास्थळ यशोधा को.ऑ.हौ.सो.लि.,बिल्डींग नं ११,कृष्णास्थळ कॉम्पलेक्स मिरारोड (पु) येथिल सोसायटीच्या आवारात असून धोकादायकरित्या उंच वाढलेले आहे.झाडाच्या झावळया सुकून खाली पडत आहे. जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरील झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (वृक्ष प्राधिकरण), उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. सबब विस्तृत माहिती महापालिका संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(कविता बोरकर)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका